# महाराष्ट्र शासन

क्र. आंजिब४९१७/(प्र.क्र.३१४/२०१७)/आस्था १४
ग्राम विकास व जल संधारण विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक :-४ जुलै,२०१७

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषदा (सर्व)

**विषय :- आंतरजिल्हा बदलीबाबत.**

शासन निर्णय दिनांक २४.०४.२०१७ अन्वये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातुन आंतरजिल्हा बदल्या करण्यात आलेल्या आहेत. काही आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकाकडुन आंतरजिल्हा बदल्या रद्द करणेबाबत शासनाकडे वारंवार विचारणा करण्यात येत असुन कोणत्याही परिस्थितीत संगणकीय प्रणालीच्या माध्यमातुन झालेल्या आंतरजिल्हा बदल्या रद्द होणार नाहीत. **परंतु, खाली नमुद परिस्थितीमध्ये आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना तात्पुरत्या स्वरुपात कार्यमुक्त करण्यात येऊ नये.**

१) ज्या प्रकरणामध्ये पती-पत्नी दोघे वेगवेगळया जिल्हयामध्ये कार्यरत असून त्या दोघांचीही एकमेकांच्या जिल्हा परिषदेमध्ये संगणकीय प्रणालीच्या माध्यमातुन आंतरजिल्हा बदली झालेली आहे.

२) ज्या प्रकरणात पती-पत्नी दोघे एकाच जिल्हा परिषदेत कार्यरत असुन दोघांनी अन्य जिल्हा परिषदेमध्ये आंतरजिल्हा बदलीसाठी अर्ज केला असुन त्यापैकी एकाचीच आंतरजिल्हा बदली झालेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा यांना सुचित करण्यात येते की, वरील अपवादात्मक परिस्थिती वगळता अन्य प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत झालेली आंतरजिल्हा बदली रद्द करण्यात येणार नाही, याची समज सर्व शिक्षकांना आपल्या स्तरावर देण्यात यावी. तसेच अन्य शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

(प्रि. शं. कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

F:\2017\V C letter.docx

www.pradipkumbhar.blogspot.in